RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ४, अंक १११] बुधवार, ऑगस्ट २९, २०१८/भाद्रपद ७, शके १९४० [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३१२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, पहिला मजला, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २९ ऑगस्ट २०१८

**अधिसूचना**

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६.**

क्रमांक संकिर्ण-२०१८/प्र.क्र.३६/ज-१अ.- महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ महा. ४१) च्या कलम ३२८, च्या पोट-कलम (१) आणि पोट-कलम (२) च्या खंड (त्रेसष्ठ) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा व त्याबाबत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून " महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरावर निर्बंध) नियम, १९६८ " यामध्ये आणखी पुढील सुधारित नियम करीत आहे. हे नियम उक्त संहितेच्या कलम-३२९ च्या, पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत :—

**नियम**

१. या नियमांना, " महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरावर निर्बंध) (सुधारणा) नियम, २०१८ " असे म्हणावे.

२. " महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरावर निर्बंध) नियम, १९६८ " च्या नियम २ चा पोट-नियम (२) ऐवजी पुढील पोट-नियम दाखल करण्यात येत आहे.—

" (२).—वर्ग (अ) खाली येणारी जमीन, धारकास कोणत्याहीवेळी लागवडीखाली आणता येईल, आणि अशाप्रकारे धारकाने जमीन लागवडीखाली आणल्यास, त्या प्रकरणी, लागवडीखालील क्षेत्राच्या आकारणीच्या प्रमाणात, पोटखराब क्षेत्र लागवडीखाली आणल्यामुळे, त्याकरिता जिल्हाधिकारी अतिरिक्त आकारणी करतील."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजेंद्र क्षीरसागर,**
शासनाचे सह सचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated 29th August 2018.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA LAND REVENUE CODE,1966.

No. Sankirn-2018/C.R.36/J-1A.— In exercise of the powers conferred by sub-section (*1*) and clause (lxiii) of sub-section (*2*) of section 328 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966) and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Land Revenue (Restrictions on Use of Land) Rules, 1968, the same having been published previously as required by sub-section (*1*) of section 329 of the said Code, namely :—

*RULES*

1. These rules may be called the Maharashtra Land Revenue (Restrictions on Use of Land) (Amendment) Rules, 2018.

2. The sub-rule *(2)* of rule 2 of the Maharashtra Land Revenue (Restrictions on Use of Land) Rules, 1968, shall be substituted, namely: –

> "(2).—Land falling in class (a) may be brought under cultivation at any time by the holder and if such land is brought under cultivation by the holder, then an additional assessment proportionate to the area of such land brought under cultivation shall be levied by the Collector.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJENDRA KSHIRSAGAR,

Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD.